मासिक

# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

RNI No. : MAHMAR/2024/89748
DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
unoindia1977@gmail.com

वर्षे २ रे | अंक ६ | ऑगस्ट२०२५ | मुल्य : २५ रु | वार्षिक वर्गणी : २५० रु. | पान ४


# प्रथम जिल्हा परिषद आणि नगरपरिषदेच्या निवडणूका?

**वर्धा :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक आपण महायुती म्हणूनच लढणार आहोत. मात्र, काही ठिकाणी स्थानिक स्तरावर निर्णय घेतले जातील. अशा ठिकाणी मित्रपक्षांवर टीका करू नका, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार दि. २८ जुलै रोजी वर्धा येथे दिला. शक्यतो पहिले जिल्हा परिषद आणि नगर परिषदांच्या निवडणुका होतील, नंतर महापालिकांच्या निवडणुका होतील असा कयास त्यांनी बांधला.

अनेक जिल्ह्यांमध्ये पक्षामध्ये छोटे-छोटे वाद आहेत. मात्र, भाजप हा पक्ष नसून परिवार आहे. परिवारात कुरबुरी असतात. तथापि, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोणीही पक्षविरोधी कारवाया करू नये. कोणी पक्षविरोधी कारस्थान केल्यास पक्ष कठोर कारवाई करील, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना दिला. सेवाग्राम येथील चरखागृहात सोमवारी भाजपचा विदर्भ विभागीय नियोजन मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मेळाव्याला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकासमंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके, कामगारमंत्री आकाश फुंडकर, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, भाजप जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्यासह विदर्भातील खासदार, आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकाने दुस-याचे आणि दुस-याने पहिल्याचे पाय ओढल्याने अनेक पक्षांचे पतन झाले. आपल्या पक्षातही अनेक जिल्ह्यांमध्ये नेते, कार्यकर्त्यांमध्ये छोटे वाद आहेत. मात्र, आपला पक्ष एक परिवार आहे. परिवारातील वाद सामोपचाराने सुटतील. निवडणुकीपूर्वी सर्वांनी वाद निकाली काढून विधानसभेच्या निवडणुकीप्रमाणे काम करायचे आहे. जनता आपल्याला अनुकूल आहे. त्यामुळे लोकांसमोर जाऊन आपल्या सरकारने केलेले काम व आपले व्हिजन त्यांना सांगा. राज्य सरकारने अनेक विकासकामे केली आहेत, ती जनतेसमोर मांडण्याचे आवाहन फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपली पार्टी बजरंगबलीसारखी आहे. बजरंगबलींना आपल्या क्षमतेची जाणीव नव्हती. ती जाणीव त्यांना करून दिल्यानंतर ते एका उडीत लंकेत पोहोचले, तसेच आपले कार्यकर्ते आहेत. निवडणूक झाली की ते शांत बसतात. मात्र, पुढील तीन महिने शांत बसू नका, असा सल्ला त्यांनी दिला.

# पोलिसांनीच कोकेन ठेवले आणि दृश्यमप्रमाणे चित्र रंगवले

- **कायदेशीर बाब सांगत असीम सरोदेंचा दावा व्हीडीओ व्हायरल केला; पुणे पोलिस गोत्यात येणार**

**मुंबई :** एकनाथ खडसेंचे जावई डॉ. प्रांजल खेवलकरांच्या अटकेप्रकरणी पोलिसांनी खासगी जीवन जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याचा दावा ॲड. असीम सरोदे यांनी केला. या प्रकरणी पोलिसांनी खासगी पार्टीला रेव्ह पार्टीचे स्वरुप दिले, कोकेनचा पुरावा प्लॅन्ट करुन त्या लोकांना समाजापुढे आरोपी असल्याचे चित्र उभे केल्याचा दावाही त्यांनी केला. हे प्रकरण उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता असून पुणे पोलिसांची अडचण वाढणार असल्याचा दावा असीम सरोदे यांनी केला.

माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर आणि इतर ७ जणांना पुणे पोलिसांनी रेव्ह पार्टी प्रकरणी अटक केली. या प्रकरणात पुणे पोलिसांनी राजकीय उद्देश ठेवून दृश्यम चित्रपटाप्रमाणे खोटे चित्र रंगवल्याचा दावा असीम सरोदे यांनी केला. घरामध्ये दारू पिणे हा गुन्हा नाही, पण पोलिसांनी याला रेव्ह पार्टीचे स्वरुप दिल्याचे सरोदे म्हणाले.

**पोलिसांनी खासगी पार्टीला रेव्ह पार्टीचे स्वरुप**

असीम सरोदे म्हणाले की विश्वास नांगरे पाटील हे पुण्याचे पोलिस अधीक्षक असताना त्यांनी एका रेव्ह पार्टीवर धाड टाकली होती. रेव्ह पार्टीमध्ये मोठ्या आवाजातील संगीत असते, लोकांची मोठी संख्या असते. तसेच त्या ठिकाणचे लोक हे अत्यंत तोकड्या कपड्यांमध्ये असतात. या पार्टीत अफू, गांजा आणि इतर नशिल्या पदार्थांचा समावेश असतो. याला रेव्ह पार्टी म्हणतात. आता पुणे पोलिसांनी जी कारवाई केली ती केस वेगळी आहे. ज्या सात लोकांना पकडण्यात आले आहे ते एका घरामध्ये दारू, बीयर पित होते. घरामध्ये दारू पिणे हा काही गुन्हा नाही. पण पोलिसांनी या प्रकरणाला राजकीय उद्देशाने रेव्ह पार्टीचे स्वरुप दिले आहे.

**पोलिसांचा राजकीय वापर**

पोलिसांचा राजकीय वापर सुरू आहे. पोलिसांनी त्या बंगल्यात जमलेल्या लोकांच्या राईट टू प्रायव्हसीचा गंभीर प्रकारे भंग केला आहे. त्यामुळे या प्रकरणी पोलिस अडचणीत येऊ शकतात असे मत असीम सरोदे यांनी व्यक्त केले.

**पोलिसांनीच पुरावे पेरले**

असीम सरोदे यांनी या प्रकरणी पोलिसांवरच आरोप केला आहे. ते म्हणाले की प्रांजल खेवलकर हे एकनाथ खडसे यांचे जावई आहेत. प्लांटेड पुराव्यांच्या आधारे डॉ. खेवलकर आणि इतरांना गुन्हेगार ठरवण्याचे कट कारस्थान हे पोलिसांनीच रचले आहे. पोलिसांनी दोन ग्रॅम कोकेन सापडल्याचा दावा केला आहे. परंतु त्यांनी सात मिलिग्रॅम कोकेन जास्त भरले पाहिजे अशी व्यवस्था करून या लोकांना बेल मिळणार नाही अशी व्यवस्था केली. पोलिसांनी एक चित्र तयार केले. राजकीय निर्देशाखाली ते वागले.

**दृश्यम चित्रपटाप्रमाणे चित्र रंगवले**

दृश्यम चित्रपटाप्रमाणे पोलिसांनी एक चित्र लोकांच्या मनावर बिंबवले. त्याची आधीच तयारी केली होती. पोलिसांनी त्याचा एक व्हीडीओ व्हायरल केला. जे लोक आरोपी नाहीत त्यांचा व्हीडीओ व्हायरल करुन पोलिसांनी त्यांच्यावरचा संशय समाजात आरोपी म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला असा आरोप असीम सरोदे यांनी केला.

**खासगी जीवन जगण्याच्या हक्काचे उल्लंघन**

असीम सरोदे म्हणाले की व्हीडीओ व्हायरल करणे म्हणजे व्यक्तीचे खासगी जीवन जगण्याच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. ही चूक पोलिसांना भोवणार आहे. पोलिसांचा वापर हा राजकीय स्वार्थातून केला जात आहे. हे राजकीय पोलिसिंग थांबले पाहिजे.

**न्यायालयात येण्यापूर्वीच पोलिसांनी व्हीडीओ व्हायरल केला**

या केसचे इतर धागेदोरे समोर येत आहेत. उच्च न्यायालयामध्ये हे प्रकरण जाण्याची शक्यता आहे. पोलिसांनी हा व्हीडीओ काढणे आणि व्हायरल करणे, न्यायालयात येण्यापूर्वीच तो व्हीडीओ व्हायरल करणे, एकनाथ खडसे यांची बदनामी करण्यासाठी हे सर्व केल्याचे दिसत आहे. पोलिसांनी स्वत:च्या अंगझडतीचा कोणताही पंचनामा न करता त्या ठिकाणी धाड टाकली आणि कोकेन पुरावा प्लँटेड केला.

# एसआयआरला स्थगिती देण्यास 'सर्वोच्च' नकार

- **बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन सुधारणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय**

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये सुरू असलेल्या विशेष सघन सुधारणा (एसआयआर) बाबत सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने एसआयआरला स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

यासोबतच, निवडणूक आयोगाला विचारण्यात आले आहे की मतदार ओळखपत्रासाठी आधार कार्ड, मतदार ओळखपत्र आणि रेशन कार्ड का स्वीकारले जात नाही. निवडणूक आयोगाने म्हटले की 'रेशन कार्डचा विचार करता येणार नाही. ते खूप मोठ्या प्रमाणात बनवले जाते, ते बनावट असण्याची शक्यता जास्त असते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले जर ही फसवणुकीची बाब असेल तर पृथ्वीवर असा कोणताही कागदपत्र नाही ज्याची प्रत करता येणार नाही. अशा परिस्थितीत, तुम्ही ११ कागदपत्रांची यादी कशासाठी केली आहे? न्यायालयाने निवडणूक आयोगाला या कागदपत्रांचा समावेश करण्याचा विचार करण्यास आणि मंगळवारी सकाळी १०:३० वाजेपर्यंत उत्तर देण्यास सांगितले आहे. न्यायालयाने म्हटले आहे की आम्ही उद्या या प्रकरणाची सुनावणी करू आणि या प्रकरणाची सविस्तर सुनावणी कधी होईल ते सांगू.

निवडणूक आयोगाने २७ जुलै रोजी एसआयआरच्या पहिल्या टप्प्याचे आकडे जाहीर केले आहेत. त्यानुसार, बिहारमध्ये आता ७.२४ कोटी मतदार आहेत. पूर्वी हा आकडा ७.८९ कोटी होता. मतदार यादीतील सुधारणांनंतर, ६५ लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. काढून टाकलेल्या नावांमध्ये अशा लोकांचा समावेश होता जे आता हयात नाहीत, किंवा कायमचे इतरत्र राहत आहेत, किंवा ज्यांची नावे दोन मतदार यादीत नोंदलेली आहेत. यापैकी २२ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. ३६ लाख मतदार स्थलांतरित झाल्याचे आढळून आले आहे, तर ७ लाख लोक आता दुस-या भागात कायमचे रहिवासी झाले आहेत.

# दिल्लीतील धर्तीवर 'पीएमपी'चे १७०० स्मार्ट बसथांबे

- **'बीओटी' तत्त्वानुसार बांधण्याचे नियोजन**

**पुणे :** शहराची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी प्रवासीकेंद्री बनविण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बीओटी) या तत्त्वानुसार १७०० स्मार्ट बसथांबे बांधण्याचे धोरण आखले आहे. दिल्लीच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर आधारित हे थांबे असणार आहेत. त्यासाठी 'पीएमपी' प्रशासनाचे शिष्टमंडळ पायाभूत सुविधांची पाहणी करण्यासाठी लवकरच दिल्ली येथे जाणार आहे.

'पीएमपी' अधिकाधिक सक्षम करून प्रवाशांना सुलभ सेवा देण्याच्या दृष्टीने अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत असून, संचलनातील मार्गिकांचे फायद्या-तोट्यानुसार विस्तारीकरण, थांब्यांचे नियोजन आणि पुनर्बांधणी या दृष्टीने गेल्या काही दिवसांत पीएमपी प्रशासनाकडून निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार 'बीओटी' तत्त्वानुसार पीएमपी थांब्यांवर प्रवाशांना पायाभूत सुविधा पुरविण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत पीएमपीच्या ४०० पेक्षा अधिक मार्गांवर सुमारे ७,५०० थांबे आहेत. या थांब्यांवर प्रवाशांना थांबण्याची किंवा बसण्याची सुविधा उपलब्ध नाही. अनेक थांबे अपुरे असून, छत नसल्याने प्रवाशांना ताटकळत पीएमपीची प्रतीक्षा करत थांबावे लागते. अनेकदा थांबा सोडून बस पुढे किंवा मागच्या बाजूला थांबत असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी होत आहेत. या पार्श्वभूमीवर थांब्यांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

दिल्लीतील थांब्यांवर महिलांच्या सुरक्षेची व्यवस्था, बसची उद्घोषणा, सीसीटीव्ही आदी सुविधा आहेत. त्याच धर्तीवर 'बीओटी'च्या माध्यमातून पीएमपीने १७०० थांबे बांधण्याचे धोरण आखले आहे. त्यासाठी 'पीएमपी' प्रशासनाचे पथक दिल्लीला अभ्यास दौरा करणार आहे. दरम्यान, पीएमपीच्या अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकपदी पंकज देवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही. त्यामुळे अभ्यास दौरा लांबणीवर पडला आहे.

# पिंपरी महापालिकेचा आकृतिबंध दोन वर्षांपासून मान्यतेच्या प्रतीक्षेत

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सुधारित आकृतिबंध दोन वर्षांपासून राज्य शासनाच्या मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे महापालिकेतील सर्व विभागांतील चार हजार ७३१ जागा रिक्त आहेत. परिणामी, पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्याने कंत्राटी कामगारांच्या जोरावर महापालिकेचा गाडा हाकला जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहर १८१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर वसले आहे. शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे महापालिकेचा 'ब' वर्गात समावेश झाला आहे. त्यामुळे महापालिकेचा नव्याने आकृतिबंध तयार करण्यात आला. अनेक नवीन पदे निर्माण झाली आहेत. महापालिकेच्या नवीन आकृतिबंधानुसार एकूण ११ हजार ५१५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ सहा हजार ७८४ पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. दर महिन्यास किमान २० ते २५ अधिकारी व कर्मचारी निवृत्त होत आहेत.

सुधारित आकृतिबंधानुसार चार हजार ७३१ जागा रिक्त आहेत. परिणामी, आवश्यक प्रमाणात अधिकारी, कर्मचारी उपलब्ध नसल्याने दैनंदिन कामकाज पूर्ण करण्याचा ताण प्रशासनावर वाढत आहे. त्यामुळे एकाच अधिकाऱ्यांकडे अनेक विभागांची जबाबदारी दिली जात आहे. कामकाज सुरळीत, गतिमान होण्यासाठी रिक्त जागा तातडीने भरण्याची गरज आहे. त्यासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे. त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, सन २००० पासून महापालिकेतून वर्ग एक ते वर्ग चारमधील सहा हजारांहून अधिक अधिकारी सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, राजीनामा, निधन, शासन सेवेत गेले आहेत.

# संपादकीय

## पुन्हा चेंगराचेंगरी!

जिथे गर्दी तेथे चेंगराचेंगरी हे समीकरण दुर्दैवाने वरचेवर खरे ठरत चालले आहे. समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याची प्रचिती येत आहे. एखादा समारंभ असो, देवदर्शनाचे निमित्त असो अथवा मनोरंजनाचा एखादा कार्यक्रम असो, गर्दी जमली की एखादी अप्रिय घटना घडणारच! काही वेळा अफवेमुळेसुद्धा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. काही महिन्यापूर्वीच बंगळुरूमध्ये आयपीएल विजेत्या आरसीबी संघाच्या स्वागत समारंभप्रसंगी चिन्नास्वामी स्टेडियममध्ये चेंगराचेंगरीची घटना घडली होती आणि काही व्यक्तींना प्राणास मुकावे लागले होते. उत्तराखंडमधील हरिद्वारमध्ये मनसादेवी मंदिरात रविवारी (२७ जुलै, २०२५) चेंगराचेंगरीची घटना घडली. त्यात ६ भाविकांचा मृत्यू झाला तर २८ जण जखमी झाले. मंदिराच्या पाय-यांवर विद्युत प्रवाहाचा धक्का बसत असल्याची अफवा पसरल्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली आणि त्यामुळे चेंगराचेंगरी झाली, अशी माहिती हरिद्वारचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक परमेंद्रसिंह डोबल यांनी दिली.

चेंगराचेंगरीनंतर सुमारे ३५ जणांना रुग्णालयात नेण्यात आले त्यापैकी ६ जणांचा मृत्यू झाला. मनसा मंदिर हरिद्वारच्या शिवालिका टेकडीवर असून जमिनीपासून ५०० फूट उंचीवर आहे. रविवार असल्यामुळे नेहमीपेक्षा जास्त भाविक दर्शनासाठी आले होते. मंदिरापासून खाली सुमारे १०० मीटर अंतरावरील पाय-यांवर विजेचा प्रवाह पसरल्याची अफवा पसरली आणि भाविक सैरावैरा पळू लागल्याने चेंगराचेंगरी झाल्याचे सांगितले जाते. पावसामुळे पाय-या निसरड्या झाल्या होत्या आणि त्यावरून भाविक घसरल्याने गोंधळ उडून चेंगराचेंगरी झाल्याचे सांगितले जाते. मृतांमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, हरियाणा आणि दिल्लीचे रहिवासी आहेत. श्रावण महिन्याच्या निमित्ताने पौराणिक महादेव मंदिरात भाविकांची गर्दी झाली होती. दरम्यान विजेची तार तुटली आणि मंदिराच्या पत्र्यावर पडली त्यामुळे काही लोकांना विजेचा धक्का बसला, असेही सांगण्यात येते. हरि की पौडी येथे स्नान केल्यानंतर भाविक मनसादेवी मंदिरात शिवालिक टेकड्यांवरील पाय-यावरून जात होते. पुढे रस्ता अरूंद होत गेल्याने गर्दी वाढली. मंदिरात जाण्यासाठी रोपवेची व्यवस्था आणि पदपथदेखील बनवण्यात आला आहे. गर्दी वाढल्यावर भाविक घाबरून पळू लागले त्यामुळे जवळच्या दुकानांचे शटरही वाकडे झाले.

विजेचा धक्का बसल्याची अफवाही पसरली; पण पोलिसांनी ती फेटाळली. मंदिरात येण्यासाठी आणि जाण्यासाठी वेगवेगळे मार्ग दाखवण्यात आले आहेत; पण बाहेर जाण्यासाठी योग्य व्यवस्था नव्हती. यामुळे हजारो भाविक पाय-यांवरून आत येत आणि बाहेर जात होते त्यामुळे गर्दीचा गोंधळ उडाला. वेळेवर योग्य पावले न उचलल्यामुळे ही दुर्घटना घडली, असे सांगितले जात आहे. श्रावण महिन्यात विशेषत: सुटीच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होणे अपेक्षित असतानाही प्रशासनाने वेळेवर तयारी का केली नाही? असा प्रश्न उपस्थित होतो. गर्दी नियंत्रणासाठी सिंगल रुट व्यवस्था आधीच लागू का केली नाही? असाही प्रश्न उपस्थित होतो. धार्मिक स्थळे व तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी गर्दीमुळे चेंगराचेंगरी होऊन श्रद्धाळू भाविकांचे हकनाक बळी जाण्याच्या घटना अलिकडे वारंवार होऊ लागल्या आहेत. अशा घटना घडत असताना गर्दीची ठिकाणे असलेल्या धार्मिक ठिकाणांवर खबरदारीची उपाययोजना करण्याचे प्रशासनाला सुचू नये हे दुर्दैवच. अलिकडे अयोद्धेतील कुंभमेळ्यात गर्दीच्या व्यवस्थापनातील दोषामुळे चेंगराचेंगरी होऊन अनेक लोक मृत्युमुखी पडले होते.

सरकार व प्रशासनाचे अपयश लपवण्यासाठी मृतांचा नेमका आकडा उत्तर प्रदेश सरकारने जनतेसमोर येऊ दिला नव्हता. त्या आधी आंध्र प्रदेशातील तिरूपती येथे वैकुंठ प्रवेशद्वारावर चेंगराचेंगरी होऊन ६ भाविकांचा मृत्यू झाला होता. उत्तर प्रदेशातील निर्वाण महोत्सवात पुरी येथे जगन्नाथाच्या रथ यात्रेदरम्यानही चेंगराचेंगरीच्या दुर्घटना घडतात असे नाही तर रेल्वे स्थानके, विजयी मिरवणुका आणि गर्दीच्या ठिकाणीही दुर्घटनेच्या घटना घडतात. अलिकडे धार्मिक स्थळांवर दुर्घटना घडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे आज लोकांकडे कोणतीही गोष्ट सबुरीने घेण्यासाठी वेळच नाही. घड्याळाच्या काट्यावर त्यांचा जीवनक्रम चालत असतो. थोड्या वेळात त्यांना अनेक कामे करायची असतात त्यामुळे ते नेहमी घाईतच असतात. घाईने पुढे जाण्याच्या, लवकरात लवकर दर्शन घेण्याच्या प्रयत्नात आपण कोणाला तरी धक्का देतोय, ढकलतोय याचे भान त्यांना राहत नाही. मग अशा धडपडीत कोणी खाली पडल्यास त्याला उठवण्याची तसदीही कोणी घेत नाही उलट त्याला तुडवून पुढे जायची तयारी असते. एखाद्या अफवेची ठिणगी पडली तर मग विचारूच नका. जो-तो सुरक्षित स्थळी जाण्याच्या प्रयत्नात असतो.

मनसादेवी मंदिरातही असाच काहीसा प्रकार घडला. अफवेमुळे निरपराध भाविकांचे बळी गेले. श्रावण महिन्यात सणांची रेलचेल असते. विविध मंदिरात भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. त्यांना कसलाही त्रास न होता शिस्तीत दर्शन मिळावे यासाठी मंदिर व्यवस्थापनाने दक्ष रहायला हवे. गरज भासल्यास पोलिसांची मदतही घ्यायला हवी. त्या दृष्टीने अगोदरच नियोजन करायला हवे. तसे झाले तरच भविष्यातील दुर्घटनांना पायबंद बसू शकेल. गतवर्षी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात द. आफ्रिकेला पराभूत करून रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ जगज्जेता बनला होता. विश्वविजेत्या भारतीय संघाचे मुंबईत जंगी स्वागत करण्यात आले होते. त्या वेळी मरिन ड्राइव्ह ते वानखेडे स्टेडियम या मार्गावर तुफान गर्दी उसळली होती; परंतु मुंबई पोलिसांनी गर्दीचे सुनियोजित व्यवस्थापन केल्यामुळे एकही अप्रिय घटना घडली नव्हती. गर्दी व्यवस्थापन करणा-या विविध संस्थांनी मुंबई पोलिसांच्या कृतीचे अनुकरण करायला हवे.

# 'ईडी'ची खरडपट्टी

सर्वोच्च न्यायालयाने मुदा घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) खरडपट्टी काढली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बी. एम. पार्वती यांच्या विरोधात ईडीने जारी केलेले समन्स कर्नाटक उच्च न्यायालयाने रद्द केले. त्याविरोधात ईडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर सुनावणी सुरू असताना सर्वोच्च न्यायालयाने ईडीची कानउघाडणी केली. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ईडीला खडे बोल सुनावले. राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढायला हव्यात. अशा लढायांसाठी ईडीचा वापर का होतोय असा सवाल न्यायालयाने केला. ईडीचे अधिकारी सर्व मर्यादांचे उल्लंघन करत असून या यंत्रणेचा राजकीय लढाईमध्ये वापर केला जात आहे, अशा परखड शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. दुर्दैवाने महाराष्ट्रात मला काही अनुभव आले आहेत. कृपया मला जास्त बोलायला लावू नका. अन्यथा आम्हाला ईडीबद्दल खूप कठोर बोलावे लागेल. राजकीय लढाया निवडणुकीत लढायला हव्यात, त्यासाठी तुमचा वापर का होतोय? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला. न्यायालयाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे ईडीची बाजू मांडणारे अतिरिक्त महाधिवक्ता एस. व्ही राजू नरमले. आम्ही याचिका मागे घेतो पण याचा पायंडा पडता काम नये असे राजू म्हणाले. यानंतर न्यायालयाने याचिका फेटाळली. कर्नाटक उच्च न्यायालयाने रद्द केलेले समन्स योग्यच असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशात काहीही गैर असल्याचे आम्हाला वाटत नाही. त्यातील तथ्य योग्यच आहे.

त्यामुळे आम्ही याचिका फेटाळत आहोत. आम्ही यावर अधिक कठोर शब्दांत सुनावणार होतो पण अतिरिक्त महाधिवक्त्यांनी याचिका मागे घेण्याची तयारी दर्शवली, त्याबद्दल त्यांचे आभार, असे सर्वोच्च न्यायालय म्हणाले. सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांच्याशी संबंधित 'म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी' (एमयूडीए) प्रकरणातील कार्यवाही रद्द करण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध ईडीने अपील दाखल केले होते. 'मुडा' प्रकरणात माझी पत्नी पार्वती यांची चौकशी करण्यासाठी ईडीचे अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळणे, ही केंद्र सरकारच्या सुडाच्या राजकारणाला मारलेली चपराक आहे, असे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी म्हटले आहे. अखेर न्याय मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सिद्धरामय्या यांच्या पत्नीला 'मुडा'ने म्हैसूरमध्ये १४ ठिकाणी जमिनी दिल्या होत्या. अत्यंत कमी किमतीत या जमिनी देण्यात आल्याचे सांगत ईडीने सदर प्रकरणाचा तपास सुरू केला होता. सिद्धरामय्या यांनी पदाचा वापर करत आर्थिक लाभासाठी जवळच्या लोकांना मदत केल्याचे तपास संस्थेचे म्हणणे होते.

आर्थिक गुन्ह्यांच्या प्रकरणात आरोपीला सल्ले देणा-या काही वकिलांना नोटिसा बजावल्या प्रकरणीही सर्वोच्च न्यायालयाने ईडीची खरडपट्टी काढली आहे. वकिलांना ज्या पद्धतीने नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत ते पाहता विधि व्यवसायाचे स्वातंत्र्य प्रभावित होऊ शकते. ईडी आता सर्व मर्यादा ओलांडत आहे, अशी टिप्पणी सरन्यायाधीश गवई यांनी केली. केअर हेल्थ इन्शुरन्स रेलिगेअर एन्टरप्राईजेस कंपनीच्या माजी अध्यक्षा रश्मी सलुजा यांनी कर्मचारी समभाग विकल्प योजनेद्वारे (ईएसओपी) समभाग देण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकरणात ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी सलुजा यांना कायदेशीर सल्ला दिला होता. सलुजा यांना देण्यात आलेल्या ईएसओपी प्रकरणाची ईडी आणि भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाकडून चौकशी सुरू आहे. केवळ कायदेशीर सल्ला म्हणून दातार आणि प्रताप वेणूगोपाल यांना नोटिसा बजावल्याच्या ईडीच्या कृत्यावर न्यायिक वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते. सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून या प्रकरणाची दखल घेत सुनावणी चालू केली आहे. वकील आणि त्याच्या अशिलामध्ये काही संवाद झाला असेल तर त्यावरून कशी काय नोटीस जारी केली जाऊ शकते असा सवाल सरन्यायाधीश गवई यांनी केला.

यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे असली पाहिजेत असे सरन्यायाधीश म्हणाले. न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणांबाबत पसरवल्या जाणा-या गैरसमजांच्या प्रभावाखाली येऊ नये, अशी अपेक्षा मेहता यांनी सुनावणी दरम्यान व्यक्त केली तेव्हा आम्ही बातम्या आणि यूट्यूबवरील मुलाखती बघत नाही, असे उत्तर सरन्यायाधीश गवई यांनी दिले. केवळ ईडीच नव्हे, तर एखाद्या संस्थेविरुद्ध कथानक तयार करण्याचा एकत्रित प्रयत्न होतो, असे सांगण्याचा प्रयत्न झाला तेव्हा ईडीचे मर्यादा उल्लंघन ही आम्हाला आढळलेली बाब आहे असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. विरोधकांवर राजकीय सूडभावनेने कारवाई करण्यासाठी सत्ताधा-यांच्या तालावर नाचणा-या ईडीचे सर्वोच्च न्यायालयाने अक्षरश: वाभाडे काढले. ईडीच्या कार्यपद्धतीचा व्हायरस देशभर प्रत्येक ठिकाणी पसरवू देऊ नका, असा सज्जड दम न्यायालयाने ईडीला दिला. न्यायालयाने ईडीचे वाभाडे काढल्याने केंद्र सरकारच्या वकिलांनी अपील मागे घेण्याची परवानगी मागितली, मात्र न्यायालयाने तशी परवानगी न देता अपील फेटाळून ईडीला दणका दिला. अनेक प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयांनी योग्य आदेश दिलेला असतो, तरीही ईडी संबंधित प्रकरणात अपील दाखल करते. म्हणजेच संबंधितांना टार्गेट करण्याचे काम ईडी करते. न्यायालयाचा वापर राजकीय व्यासपीठ म्हणून करू नका असे सांगत न्यायालयाने ईडीची प्रवृत्ती ठेचली आहे. ईडीची खरडपट्टी काढताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढल्या पाहिजेत. मतदारांमध्ये राजकीय लढाई लढू द्या, त्यासाठी तुमचा वापर का केला जात आहे? सरन्यायाधीश गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांनी ईडीला आरशासमोर उभे केले आणि मोकाट सुटलेल्या या यंत्रणेला नागडे रूप पाहावयास लावले. ईडीसारख्या यंत्रणांचा गैरवापर हा भारतीय संविधानाचा गैरवापर आहे. कायद्याची, न्यायाची कोणतीही मूल्ये ईडीने पाळल्याचे दिसत नाही.

# रहस्यमय गच्छन्ती!

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी रात्री उशिरा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे राजीनामा सादर केला. मंगळवारी दुपारी राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. या राजीनामापत्रात धनखड यांनी प्रकृतीचे कारण दिले आहे. मात्र पूर्ण दिवस राज्यसभेचे कामकाज व्यवस्थित चालविल्यानंतर अचानक प्रकृती कशी बिघडली? राजीनामा रहस्यमय आहे असा दावा विरोधी पक्षातील नेत्यांनी केला आहे. प्रकृतीचे कारण की राजकारण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या राजीनाम्यावर अनेक प्रश्न उपस्थित करत मंगळवारी संसदेत गदारोळही झाला. मात्र, केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल यांनी धनखड यांच्या राजीनाम्याबद्दल सरकारला कल्पना नसल्याचे स्पष्ट केले. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी 'एक्स'वर लिहिले की, सोमवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास जगदीप धनखड यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीला सभागृह नेते जे.

पी. नड्डा आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. थोड्या वेळच्या चर्चे नंतर पुढील बैठक संध्याकाळी साडेचार वाजता घेण्याचे ठरले. त्यावेळी पुन्हा एकदा धनखड यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे सदस्य बैठकीला हजर झाले. सर्वजण नड्डा आणि रिजिजू यांची वाट पहात होते. पण ते आलेच नाहीत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या दोन्ही मंत्र्यांनी संध्याकाळच्या बैठकीला उपस्थित राहणार नाही याबाबत धनखड यांना कोणतीही माहिती दिली नाही. या गोष्टीचे धनखड यांना वाईट वाटले आणि त्यांनी कामकाज सल्लागार समितीची बैठक पुढे ढकलून मंगळवारी दुपारी एक वाजता ठेवली. पंतप्रधान मोदी मंगळवारी दिवसभर संसद भवनात होते. त्यांनी दोन बैठका घेतल्या. या बैठकीत न्या. वर्मा यांच्यावरील महाभियोगाची चर्चा झाली की, धनखड यांच्या राजीनाम्याबाबत चर्चा झाली हे गुलदस्त्यात आहे. मात्र, यावरून हे स्पष्ट होते की, सोमवारी १ ते ४:३० वाजेपर्यंत नक्कीच काहीतरी गंभीर घडले. म्हणूनच नड्डा आणि रिजिजू यांनी मुद्दाम संध्याकाळच्या बैठकीला उपस्थित राहणे टाळले. त्यानंतर धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला.

त्यामागे काहीतरी महत्त्वाचे कारण असू शकते. खरे तर जगदीप धनखड यांनी नेहमीच २०१४ नंतरच्या भारताची प्रशंसा केली. पण त्याचवेळी शेतक-यांच्या हितासाठी स्पष्टपणे आवाज उठवला. त्यांनी सार्वजनिक जीवनातील वाढत्या अहंकारावरही टीका केली आणि न्यायपालिकेची जबाबदारी व संयम यावर भर दिला. मोदी सरकारच्या काळातही शक्य तितक्या प्रमाणात त्यांनी विरोधकांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. त्यांना नियम, प्रक्रिया आणि संसदीय शिस्त याबाबत आदर होता. पण त्यांच्या भूमिकेमध्ये सतत याची उपेक्षा होत असल्याची भावना जाणवत होती. धनखड यांचा राजीनामा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी अनेक गोष्टी स्पष्ट करतो. त्याचबरोबर ज्यांनी त्यांना उपराष्ट्रपतिपदापर्यंत पोहोचवले त्या व्यक्तींच्या हेतूंवरही तो गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा दिला असला तरी केंद्र सरकार आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाला ते डोईजड झाल्यामुळे त्यांची 'हकालपट्टी' करण्यात आल्याचे मंगळवारी स्पष्ट झाले. 'वरिष्ठां'ना न विचारता न्या. वर्मा यांच्यावर विरोधकांनी आणलेला महाभियोग प्रस्ताव स्वीकारणे धनखड यांना भोवल्याचे सांगितले जाते. भाजपकडून न्या. यशवंत वर्मांविरोधात महाभियोग प्रस्ताव लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे देण्यात आला. त्याचवेळी ६६ विरोधी पक्षांच्या सदस्यांनी स्वाक्ष-या केलेला प्रस्ताव धनखड यांनी स्वीकारला.

त्यामुळे 'एकमताने महाभियोग' चालविण्याचे सत्ताधा-यांचे मनसुबे उधळले गेले व भाजपची नाचक्की झाली. त्यानंतर पंतप्रधान मोदी, अमित शहा आणि राजनाथ सिंह यांची महत्त्वाची बैठक झाली. राजनाथ सिंह यांच्या दालनातही काही बैठका झाल्या. त्यावेळी नड्डा व रिजिजू उपस्थित होते. त्यानंतर धनखड यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले, असे सांगितले जाते. न्या. वर्मा यांच्या विरोधातील महाभियोग कारवाई भाजप व राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पुढाकाराने झाली पाहिजे अशी केंद्रीय नेतृत्वाची भूमिका होती. धनखड यांनी राजीनामा का दिला? याचे स्पष्टीकरण केंद्राने द्यावे, अशी मागणी काँग्रेसने मंगळवारी केली. धनखड यांनी प्रकृती बरी नसल्याने राजीनामा दिला की, राजकीय कारणामुळे पद सोडले असा सवाल समाजवादी पक्ष, भाकप, शिवसेना(उबाठा) व विरोधी पक्षांनी उपस्थित केला. काँग्रेस नेते हरिश रावत म्हणाले की, धनखड यांच्या राजीनाम्याची बातमी अत्यंत धक्कादायक आहे. त्यांच्या राजीनाम्यामागे असाधारण कारण असू शकते. सरकारमध्ये कुठेतरी काहीतरी असे घडत होते की, त्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी स्वत:च्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी राजीनाम्याचा निर्णय घेतला असावा. खासदार मनीष तिवारी म्हणाले, धनखड यांचा राजीनामा रहस्यमय आहे. कारण उपराष्ट्रपतिपद हे दुस-या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे.

ज्या अनपेक्षित पद्धतीने त्यांनी राजीनामा दिला ती गोष्ट गोंधळात टाकणारी आहे. खासदार भूपेश बघेल म्हणाले, धनखड यांचा राजीनामा राजकीय वादळाचे संकेत दर्शवितो. धनखड यांच्या राजीनाम्यावर भाजपच्या कोणत्याही नेत्याने प्रतिक्रिया दिली नाही. पंतप्रधान मोदी 'एक्स'वर म्हणाले, धनखड यांना देशाचे उपराष्ट्रपती तसेच अनेक महत्त्वाच्या भूमिका निभावत राष्ट्रसेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या उत्तम आरोग्याची मी मनापासून प्रार्थना करतो. आता केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना उपराष्ट्रपतिपद दिले जाईल अशी चर्चा आहे. कारण ते लवकरच ७५ वर्षांचे होत आहेत. भाजपच्या नव्या नियमानुसार त्यांना सक्रिय राजकारणापासून निवृत्त व्हावे लागेल. आता निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपती निवडीची प्रक्रिया सुरू केली आहे.

**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).**

**संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# शहरातील नदीकाठचे रस्ते पाण्याखाली

■ **खडकवासला धरणातील विसर्गात वाढ; नागरिकांना सावधानतेचा इशारा**

**पुणे :** पानशेत आणि वरसगाव धरणे शंभर टक्के भरण्याच्या मार्गावर असल्याने खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी खडकवासला धरणातून सुरू असलेल्या विसर्गात सोमवारी वाढ करण्यात आली. त्यामुळे मुठा नदी दुथडी भरून वाहत असून, नदीकाठच्या परिसरात पुराचे पाणी शिरले. नदीपात्रातील रस्त्यासह भिडे पूलही पाण्याखाली गेला असून नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जलसंपदा विभाग आणि महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या वर्षीसारखी पूरपरिस्थिती उद्‌भवू नये, यासाठी महापालिकेकडून खबरदारी घेण्यात आली आहे.

शहराला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या दीड महिन्यापासून या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. या साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कायम असल्याने पानशेत आणि वरसगाव धरणे नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त भरली आहेत. ही दोन्ही धरणे पाणीसाठ्याच्या दृष्टीने मोठ्या क्षमतेची असून त्या तुलनेत लहान असलेले खडकवासला धरणही ऐंशी टक्क्यांपर्यंत भरले आहे. त्यामुळे खडकवासला धरणातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी खडकवासला धरणातून रविवारपासून विसर्गाला सुरुवात करण्यात आली आहे.

खडकवासला धरणातून रविवारी सायंकाळी १८ हजार ४८३ क्युसेक एवढा विसर्ग सुरू होता. हा विसर्ग सोमवारी दुपारी २५ हजार ६९६ एवढा करण्यात आला. मात्र धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर येवा येत असल्यामुळे सायंकाळी सात वाजता त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार तो २८ हजार ६६२ क्युसेक करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार तसेच येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्याने मुठा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. विसर्गात वाढ होण्याची शक्यता असल्याने महापालिकेकडून पथके तैनात करण्यात आली आहेत. विशेषत: सिंहगड रस्ता परिसरातील एकतानगरी, विठ्ठलवाडी येथील नदीकाठच्या अनेक सोसायट्यांना सावध राहण्याची सूचना करण्यात आली. महापालिकेकडून साहाय्यता कक्षही स्थापन करण्यात आला आहे.

# तरच मिळणार शिष्यवृत्तीचा लाभ महाविद्यालये, विद्यापीठांना मिळणार

**पुणे :** विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी संकेतस्थळावर महाविद्यालये, विद्यापीठांनी त्यांची माहिती अद्ययावत करण्याचे निर्देश उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिले आहेत. राज्य शासन, विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्काप्रमाणे महाविद्यालयांनी अभ्यासक्रम शुल्काबाबत माहिती भरणे आवश्यक आहे. तसेच, शुल्क निश्चितीबाबतची कागदपत्रे महाडीबीटी संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या विविध विभागांतर्फे शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी संकेतस्थळाद्वारे राबवण्यात येतात. त्यात उच्च शिक्षण संचालनालयाच्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६साठी महाडीबीटी संकेतस्थळावरून विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महाविद्यालय, विद्यापीठाचे खाते अद्ययावत असणे आवश्यक आहे. त्यात महाविद्यालयाचे नाव, पत्ता, लिपिक, प्राचार्य यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, महाविद्यालयातील अभ्यासक्रम, त्यांचे शुल्क यांचा समावेश आहे. ही माहिती अद्ययावत करण्याची सुविधा १७ जूनपासून सुरू करण्यात आली आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी १६ प्रकारच्या इतर शुल्कांचा लाभ देण्यात येतो. मात्र, महाडीबीटी संकेतस्थळावर १० घटकांचाच समावेश असल्याने महाविद्यालयांनी इतर शुल्कांची माहिती भरावी. शुल्कासाठी जबाबदार प्राधिकरणाकडून कोणताही बदल झाल्यास त्याप्रमाणे बदल करण्यात यावेत. महाविद्यालयाने संकेतस्थळावर नमूद केलेले अभ्यासक्रम, त्यांचे शुल्क यांच्या आधारेच शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्यात येणार असल्याने संबंधित माहिती अचूक असणे आवश्यक आहे.

महाविद्यालयांनी त्यांचे अभ्यासक्रम आणि शुल्क याबाबतची माहिती १ डिसेंबर २०२५ पर्यंत भरून त्यास संबंधित विभागीय सहसंचालक, शिक्षणशुल्क समिती, शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी त्यांच्या अभ्यासक्रम शुल्काची माहिती भरताना अभ्यासक्रमाचा जितका कालावधी असेल, त्यापेक्षा दोन वर्षे अधिक कालावधीच्या शुल्काची माहिती भरावी. महाविद्यालयाचा अभ्यासक्रम आणि शुल्क याबाबतच्या माहितीस विभागाने मंजुरी दिल्यानंतर ही माहिती महाडीबीटी संकेतस्थळावर दर्शवली जाते. त्यानंतर त्या माहितीमध्ये बदल करता येत नाही. विभागाने दिलेल्या शुल्कानुसारच शिष्यवृत्तीचे लाभ देण्यात येणार आहेत. त्यामुळे त्याबाबत दक्षता घेणे गरजेचे असल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

# बावधनमध्ये ट्रेडिंगच्या बहाण्याने ५२ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** ट्रेडिंग पमध्ये जादा परताव्याचे आमिष दाखवून एका महिलेची ५२ लाख ३८ हजार ९३३ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार बावधन परिसरात उघडकीस आला. या प्रकरणात एका महिलेने बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेसह तिच्या साथीदारांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेने फिर्यादी महिलेला जादा नफ्याचे आमिष दाखवत ट्रेडिंग पमध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले. सुरुवातीला चांगला परतावा देऊन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर ४७ लाख ३८ हजार ९३३ रुपये गुंतवण्यास भाग पाडले आणि त्यांच्या आभासी खात्यावर मोठा फायदा झाल्याचे दर्शवले. जेव्हा फिर्यादीने ही रक्कम परत मागितली, तेव्हा त्यांना जमा रकमेवर पाच लाख रुपये कर भरण्यास भाग पाडले. कर भरल्यानंतरही त्यांची रक्कम परत न करता त्यांची ५२ लाख ३८ हजार ९३३ रुपये एवढ्या रकमेची फसवणूक केली. बावधन पोलीस तपास करत आहेत.

# पुण्यातील त्या १६ चितळांचा मृत्यू कशामुळे?

**पुणे :** महापालिकेच्या राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील १६ चितळांच्या मृत्यूच्या संदर्भातील अहवाल आला असून, 'लाळ खुरकत' या विषाणूजन्य आजाराचे संक्रमण झाल्याचे निदान झाले आहे. हा आजार इतर प्राण्यांना होऊ नये, यासाठी आवश्यक ती उपाययोजना केली जात आहे. तसेच, इतर बाधित चितळांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत असल्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात आली.

महापालिकेच्या कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील १६ चितळांचा मृत्यू झाल्याचे समोर आले होते. महिना ते पंधरा दिवसांत हे मृत्यू झाले होते. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनातदेखील याचे पडसाद उमटले होते. मृत चितळांच्या मृत्यूच्या निदानाकरिता विविध शासकीय संस्थांना समाविष्ट करण्यात आले होते. मृत प्राण्यांचे शवविच्छेदन करून जैविक नमुने संकलित करण्यासाठी पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ व विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा पशुसंवर्धन विभागाच्या तज्ज्ञांच्या पथकाला बोलाविण्यात आले होते. या पथकाने संकलित केलेले जैविक नमुने ओडिशा, भुवनेश्वर येथील राष्ट्रीय लाळ खुरकत संशोधन केंद्र, बरेली येथील भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्था, नागपूर येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र, भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग शाळा, येथे तपासणीसाठी पाठविले होते.

# शेतकऱ्यांचा विरोध असल्याचा दावा

■ **पुरंदर विमानतळासाठी जागा देण्याच्या संदर्भात ग्रामस्थांचे म्हणणे**

**पुणे :** पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाची अधिसूचना काढण्यात आल्यानंतर हरकती आणि सूचना घेण्याची प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत आलेल्या २३०७ हरकतींपैकी १८९५ शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध दर्शविला असल्याचा दावा पुरंदर विमानतळविरोधी समितीने पत्रकार परिषदेत केला.

पारगावच्या सरपंच ज्योती मेमाणे, खानवडीच्या सरपंच स्वप्नाली होले, एखतपूर-मुंजवडीच्या सरपंच शीतल टिळेकर, कुंभारवळण गावच्या सरपंच राजश्री कुंभारकर, उदाचीवाडी गावच्या सरपंच आशा हगवणे आणि कुंभारवळणच्या सरपंच मंजूषा गायकवाड आदी पत्रकार परिषदेस उपस्थित होते.

'बाधित सातही गावांतील ग्रामस्थांच्या हरकती आणि सूचनांची प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत विरोधाचे प्रमाण ९५.३० टक्के आहे. सहमती दर्शविण्याचे प्रमाण अवघे ४.७० टक्के आहे. सहमती दर्शविणारे ९३ जण हे शेतकरी नसून गुंतवणूकदार आहेत. सात गावांत सुमारे ३०० घरे असून, उर्वरित ९० टक्के शेतकरी हे वाड्या, वस्त्या आणि शेताच्या ठिकाणी राहत आहेत. विमानतळामुळे गावे, वाड्या, वस्त्या, बागायती शेती नष्ट होणार आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होत असताना प्रशासकीय अधिकारी आणि राज्यकर्ते दिशाभूल करणारी माहिती पसरवत आहेत,' असा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला.

'दहा टक्के परतावा आणि पुनर्वसन या गोष्टी शेतकऱ्यांच्या हिताच्या नसून, २,२७९ कुटुंब उद्ध्वस्त होत आहेत.

# ज्येष्ठाला जखमी अवस्थेत निर्जनस्थळी टाकून रिक्षाचालक पसार, वेळेत उपचार न मिळाल्याने ज्येष्ठाचा मृत्यू

**पुणे :** बाणेर भागात रिक्षा चालकाने दिलेल्या धडकेत ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाला. त्यांना उपचारासाठी घेऊन जातो, अशी बतावणी करून रिक्षाचालकाने रिक्षात बसवले. त्यानंतर खडकीतील रेंजहिल्स परिसरात रेल्वे रूळाजवळ त्यांना जखमी अवस्थेत सोडून रिक्षाचालक पसार झाला. वेळेत उपचार न मिळाल्याने ज्येष्ठाचा मृत्यू झाला. याप्रकरणी रिक्षाचालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत ज्येष्ठ नागरिकाच्या मुलाने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जुलै रोजी दुपारी सव्वातीनच्या सुमारास ज्येष्ठ नागरिक हे काही कामानिमित्त बाहेर पडले. बाहेर पडताना त्यांनी पत्नीला सांगितले. त्यानंतर सायंकाळी सातपर्यंत ते घरी परतले नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी नातेवाईक, तसेच निकटवर्तीयांकडे चौकशी केली. वडील घरी न परतल्याने मुलगा तक्रार देण्यासाठी बाणेर पोलीस ठाण्यात गेला.

# साखर संकुलाजवळून उड्डाणपूल, जुन्या मुंबई-पुणे रस्त्याला जाण्यासाठी फायदा

**पुणे :** कृषी महाविद्यालयाजवळून साखर संकुल येथून जुन्या पुणे-मुंबई रस्त्याला जाण्यासाठी महापालिकेच्या वतीने येथे उड्डाणपूल बांधला जाणार आहे. या उड्डाणपुलाचा एक भाग शिवाजीनगर एसटी स्थानकाजवळ जोडला जाणार असल्याने संगमवाडीमार्गे येरवडा तसेच मुंबई, नाशिककडे जाणाऱ्या गाड्यांना वाहतूक कोंडीत न अडकता थेट या पुलाचा वापर करता येणार आहे.

सध्या नरवीर तानाजी वाडी येथे असलेल्या रेल्वे मार्गावरून हा पूल तयार केला जाणार आहे. या उड्डाणपुलामुळे गणेशखिंड रस्त्याबरोबरच संचेती रुग्णालयाच्या चौकात होणारी वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. महापालिकेच्या प्रकल्प विभागाने गणेशखिंड रस्त्यावरून साखर संकुलाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जुन्या पुणे-मुंबई रस्त्याकडे जाण्यासाठी वाय आकारातील उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन केले आहे.

याची एक बाजू पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर, तर दुसरी बाजू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दिशेला उतरेल.

# पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात या अद्ययावत तंत्रज्ञानासाठी मंजुरी नाही

■ **जुन्याच पद्धतीचा अवलंब होत असल्याने अडथळे**

**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये प्रवाशांना ने-आण करणाऱ्या खासगी वाहने दीर्घ काळ थांबल्यास अद्ययावत 'स्वयंचलित प्रणाली'चा (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन, एएनपीआर) अवलंब करण्यात येणार आहे. मात्र, त्याला अद्याप मंजुरी मिळाली नसल्याने जुन्याच पद्धतीने या वाहनांवर कारवाई होत आहे. ही कारवाई पुरेशी ठरत नसल्याने समस्या कायम आहे.

पुणेविमानतळावरप्रवाशांची वर्दळ वाढली आहे. अनेक प्रवासी विमानतळावर सहज आणि वेळेत पोहचण्यासाठी किंवा विमानातून उतरल्यानंतर नियोजित ठिकाणी जाण्यासाठी खासगी वाहन किंवा कॅबचा अवलंब करतात. विमानतळ प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार अशा वाहनांसाठी कालमर्यादा निश्चित आहे. त्यापेक्षा अधिक काळ वाहने थांबली, तर अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी विमानतळ प्रशासनाने परिसरात चार ते पाच कर्मचारी तैनात केले आहेत. मात्र, हे कर्मचारी पुरेसे नसल्याचे चित्र असून, अनेक वाहने प्रवाशांची प्रतीक्षा करीत दीर्घ काळ थांबलेली असतात, अशी माहिती विमानतळावरील काही प्रवाशांनी दिली.

या समस्येच्या पार्श्वभूमीवर विमानतळ परिसरात येणाऱ्या वाहनांवर अद्ययावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्वयंचलित प्रणालीद्वारे दंडात्मक कारवाई करण्याबाबत प्रस्ताव विमानतळ प्राधिकरणाला पाठवला आहे. मात्र, या अहवालाला मंजुरी मिळालेली नाही. पुणे विमानतळ परिसरात दीर्घ काळ थांबून अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी चार ते पाच कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांनी अशा वाहनचालकांना हटकल्यास त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. अनेकदा वाहनचालक आणि कर्मचारी यांच्यात शाब्दिक बाचाबाचीच्या घटना घडल्या आहेत.

# जुन्नरचे आमदार शरद सोनवणे आक्षेपार्ह वक्तव्याने वादात

■ **आदिवासी मंत्री, समाजाबद्दल माफी मागण्याची वेळ**

**पुणे :** पारधी आणि रामोशी समाजाविषयी आक्षेपार्ह विधान आणि राज्याचे आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याने जुन्नरचे आमदार शरद सोनवणे हे वादात सापडले. संतप्त आदिवासी समाजाने आमदार सोनवणे यांच्या जुन्नरमधील चाळकवाडी येथील 'राजगड' या निवासस्थानासमोर आंदोलन केले. त्यानंतर आमदार शरद सोनवणे यांच्यावर दोनवेळा माफी मागण्याची वेळ आली.

जुन्नर येथे अधिकाऱ्यांबरोबर आमदार सोनवणे यांनी गेल्या शुक्रवारी आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी जुन्नर तालुक्यामध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले असल्याने पोलिसांनी सतर्क राहावे, अशा सूचना आमदार सोनवणे यांनी केल्या. या तालुक्यात होणाऱ्या चोऱ्या अहिल्यानगर भागातील रामोशी, फासेपारधी लोक करत असल्याचा आरोप आमदार सोनवणे यांनी केला. त्याचे तीव्र पडसाद या समाजांमध्ये उमटले.

पारधी समाजाचे नेतृत्त्व करणाऱ्या भाजपच्या माजी नगरसेविका राजश्री काळे यांनी आमदार सोनवणे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. 'ब्रिटिशांनी या समाजांवर गुन्हेगारीचा शिक्का मारला होता. मात्र, अद्यापही ब्रिटिशांची मनोवृत्ती असलेली माणसे आहेत. आमदार सोनवणे यांच्या वक्तव्यातून ही बाब दिसून येते. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा'.

## सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे दादासाहेब गवई यांना अभिवादन

**अमरावती :** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दारापूर येथे आज त्यांचे वडील रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस्थळी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दारापूर येथे डॉ. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या स्मृतीदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार बळवंत वानखडे, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई, संस्थेच्या अध्यक्ष कीर्ती गवई अर्जून, तेजस्विनी गवई, संस्थेचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई, तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापूरचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, धरम गवई आदी यावेळी उपस्थित होते. दारापुर फाटा येथे उभारल्या जाणाऱ्या दारापूर गावाचे प्रवेशद्वार श्री. दादासाहेब गवई यांच्या स्मृतिव्दाराच्या बांधकामाचे भूमिपूजन सरन्यायाधीश न्या. गवई यांचे हस्ते यावेळी करण्यात आले. त्यानंतर तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परीसरातील दादासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यात आले.

## ‘नदी सुधार’साठी एक हजार झाडांवर कुऱ्हाड?

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या मुळा नदीच्या वाकड ते सांगवीदरम्यानच्या सुधारासाठी एक हजार झाडे तोडण्यात येणार आहेत. याबाबत महापालिकेच्या उद्यान विभागाने ३१ जुलैपर्यंत हरकती व सूचना मागविल्या आहेत. नदी सुधारसाठी झाडे तोडण्यास वृक्षप्रेमींनी विरोध दर्शविला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने हद्दीतून वाहणाऱ्या मुळा नदी सुधारचे काम हाती घेतले आहे. तीन टप्प्यांमध्ये काम केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात सूर्या रुग्णालय, वाकड ते कस्पटे वस्ती स्मशानभूमी, दुसऱ्या टप्प्यात कस्पटे पूल ते पिंपळे निलख येथील इंगोले घाट आणि तिसऱ्या टप्प्यात इंगोले घाट ते जुनी सांगवी पुलापर्यंत काम करण्यात येणार आहे. महापालिकेच्या उद्यान आणि पर्यावरण विभागाने नदी सुधार प्रकल्पांना अडथळा ठरणाऱ्या वृक्षांचे सर्वेक्षण केले. वाकड ते सांगवीदरम्यान नदीकाठी सहा हजार ८४६ विविध प्रजातीची झाडे आढळली. त्यातील तीन हजार ५८५ झाडे प्रकल्पापासून बाधित होत असतानाही वाचविण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

तर, दोन हजार २५२ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे. प्रकल्पाला अडथळा ठरणारी एक हजार नऊ झाडे तोडावी लागणार आहेत. यामध्ये बहुतांशी झाडे ही करंज, चिंच, बाभूळ, जंगली एरंडेल अशा प्रजातीची असल्याचे महापालिकेच्या उद्यान विभागाने सांगितले आहे. या वृक्षांबाबत पर्यावरणप्रेमींसह अन्य कोणाचा आक्षेप असल्यास योग्य कारण, वस्तुस्थितीदर्शक पुराव्यासह लेखी हरकत घेण्याचे आवाहन उद्यान विभागाने केले आहे. ३१ जुलैपर्यंत हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. या हरकतींवर ४ ऑगस्ट रोजी सुनावणी घेण्यात येणार आहे.

मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी अडथळा ठरणारी एक हजार नऊ झाडे तोडावी लागणार आहेत. यामध्ये करंज, चिंच, बाभूळ अशा विविध प्रजातींच्या झाडांचा समावेश आहे. नागरिकांच्या हरकती मागविल्या आहेत. हरकतींवरील सुनावणीनंतर वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात येईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाचे वृक्षाधिकारी महेश गारगोटे यांनी सांगितले.

मुळा नदी सुधार प्रकल्पासाठी अवैधरीत्या काही झाडे तोडली आहेत. याप्रकरणी गुन्हे दाखल झाले पाहिजेत. त्या व्यतिरिक्त नव्याने एक हजार झाडे तोडण्याचा प्रस्ताव आणला आहे. ही झाडे तोडू नयेत. पुनर्रोपण केलेली झाडे जगत नाहीत, असे वृक्षप्रेमी प्रशांत राऊळ म्हणाले.

## प्राचार्यांचे निवृत्ती वय ६५ करण्यासाठी सकारात्मक - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

■ **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा**

**अमरावती :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20च्या प्रभावी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि प्राचार्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी धोरणाचे सर्व पैलू समजून घ्यावेत. प्राचार्यांच्या मागणीनुसार, त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय लवकरच घेतला जाईल, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज येथे केले.




श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या ४० व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार किरण सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक-आधारित शिक्षणाची आज गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही गरज पूर्ण करेल. विद्यार्थी हित जोपासून शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राला अग्रस्थान मिळवून देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आधुनिक अभ्यासक्रम तयार करणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना कारखान्यात प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि सायंकाळी सैद्धांतिक अभ्यास अशी शिक्षण पद्धती राबवली जावी. यामुळे रोजगारनिर्मिती आणि संशोधनाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले. मंत्री पाटील यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत भारताला सर्व क्षेत्रात अग्रेसर करण्यासाठी युवा पिढीला संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे हे उद्दिष्ट साध्य होईल. बेरोजगारी संपवून प्रत्येकाच्या हाताला काम देणे, यातूनच आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.



## राज्यपालांची राजभवन येथील कर्करोग जनजागृती शिबिराला भेट

**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित कर्करोग जनजागृती शिबिराला भेट देऊन तपासणी आणि जनजागृती उपक्रमाची माहिती घेतली.

महिलांनी व मुलींनी कर्करोगासंदर्भातील पूर्व चाचणी नियमितपणे करून घ्यावी. तसेच, कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी अशा शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे. पूर्व तपासणीतून रोग लवकर लक्षात आल्यास वेळेवर निदान व उपचार शक्य होतात. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी अशा शिबिरांमध्ये सहभागी होऊन चाचणी करून घ्यावी, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

राजभवन, मुंबई डिस्पेंसरी आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग जनजागृती शिबिर व व्याख्यानाचे आयोजन राजभवन क्लब येथे करण्यात आले.

कर्करोग पूर्व निदानासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातही ९ ते ४५ वयोगटातील मुली आणि महिलांसाठी गर्भाशयाच्या कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली. उइउ, मॅमोग्राफी, पॅप स्मिअर, क्ष्रत टेस्ट, एछ्ढ तपासणी आणि प्रोस्टेट (झड-) टेस्ट यांचा समावेश होता. एकूण ११० व्यक्तिंना ह्यूमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) प्रतिबंधक लस देण्यात आली. तपासणी शिबीराचा १७१ कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

यावेळी आरोग्य तपासणी कार्यक्रमात कॅन्सर पेशंट एड असोसिएशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. अलका सप्रू बिसेन; कॅन्सर स्क्रिनिंग सेवा विभागाच्या कार्यकारी संचालिका सौ. नीता मोरे ; स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. तृप्ती पोयरेकर; तसेच जनरल सर्जन डॉ. सत्येंद्र मेहरा यांनी त्यांच्या तज्ज्ञ टीम व कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनचे पदाधिकारी व राजभवन दवाखान्यातील डॉक्टर, कर्मचारी, उपस्थित होते.

## स्मशानभूमीतील धुराचे प्रदूषण रोखण्यासाठी नियमांची निश्चिती

**पुणे :** स्मशानभूमीतून बाहेर पडणाऱ्या धुराद्वारे होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी राज्य पातळीवर नियमांची निश्चिती करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना दिली. मंडळ हे केवळ दंड आकारणारी यंत्रणा एवढ्यापुरतीच मर्यादित राहणार नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

एका कार्यक्रमासाठी पुण्यात आलेले कदम यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. स्मशानभूमीतून बाहेर पडणाऱ्या धुराचा त्रास होत असल्याचे एका पुणेकराने समाजमाध्यमाद्वारे मला कळविले. त्या संदर्भात मी अधिकाऱ्यांना लक्ष घालण्यास सांगितले आहे. मात्र, हा केवळ एका स्मशानभूमीपुरता प्रश्न नाही. अशीच परिस्थिती सर्वत्र असू शकते, हे ध्यानात घेऊन स्मशानभूमीतून बाहेर पडणाऱ्या धुराद्वारे होत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी राज्य पातळीवर नियमांची निश्चिती करण्यात येणार असल्याचे कदम यांनी सांगितले.

‘यामध्ये अंत्यसंस्कार पारंपरिक लाकडे-गोवऱ्यांचा वापर करून करावेत किंवा विद्युतदाहिनी आणि गॅसदाहिनीवर करावेत, याचे कोणतेही बंधन असणार नाही. ती बाब स्थानिक स्वराज्य संस्थांनी ध्यानात घ्यावयाची आहे,’ याकडे त्यांनी लक्ष वेधले. आळंदी येथील इंद्रायणी नदीच्या प्रदूषणासंदर्भात विचारले असता, कदम म्हणाले, ‘आळंदीमध्ये सांडपाणी प्रक्रिया करण्याच्या योजना सुरू आहेत. नगर परिषदेच्या माध्यमातून त्याला गती देण्यात येत असून, हे काम पूर्णत्वास गेल्यानंतर इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न सुटू शकेल.’

## अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत वारसाला नोकरी देण्यासाठी कार्यपद्धती तयार करा - उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम

**मुंबई :** अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत, अत्याचार प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या पदावर प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती सामाजिक न्याय विभागाने तयार करावी, असे निर्देश अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याच्या वारसाला नोकरी देण्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव रवींद्र गोरवे, मुंबई विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, पुणे विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, अवर सचिव सतीश खैरमोडे, विभागातील संगीता शिंदे, किशोर बडगुजर, गणेश भदाने, संजय कोठे, शिवानंद भिनगीरे यांच्यासह सामाजिक न्याय विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपाध्यक्ष श्री. मेश्राम म्हणाले, या प्रक्रियेसाठी प्रादेशिक उपआयुक्त कार्यालयाने जिल्हानिहाय वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील रिक्त पदांची यादी सर्व प्रादेशिक उपायुक्तांनी संकलित करून ती समाज कल्याण आयुक्तालयाकडे १५ दिवसात सादर करावी. काही जिल्ह्यात वारसांना नोकरी देण्यात आली आहे ती कोणत्या आधारावर दिली आहे त्याप्रमाणे इतर जिल्ह्यात याबाबत का कार्यवाही करण्यात आली नाही याबाबतचा अहवाल मागवावा. सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत बैठक घेण्यात यावी. इतर राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी कशी करण्यात आली किंवा नेमके काय दिशानिर्देश आहेत.

## महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विस्तारीकरणाकरिता भुसंपादनाची कामे गतीने पूर्ण करा

**पुणे :** ‘महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरण’ म्हणून आरक्षित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून विस्तारीकरणाकरिता आरक्षित क्षेत्राच्या भुसंपादनाचे काम गतीने पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी निर्देश दिले. भिडेवाडा, महात्मा फुलेवाडा येथे भेट देवून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामकाजाबाबत माहिती घेतली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन, उपायुक्त अविनाश संकपाळ, सहायक आयुक्त किसन दगडखैर, भूसंपादन उपायुक्त वसुंधरा बारवे, अधीक्षक अभियंता रोहिदास गव्हाणे, अधिक्षक अभियंता राजेश बनकर आदी उपस्थित होते. श्री भुजबळ म्हणाले, महात्मा फुले वाडा व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक एकत्रीकरण व विस्तारीकरणासाठी आवश्यक भूसंपादन व इतर कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून शासनाकडून १०० कोटी रुपयांचा निधी महानगरपालिकेला उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या स्मारकालगतच्या आरक्षित क्षेत्राचे पुणे महानगरपालिकेच्यावतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले आहे. स्मारकांचे कामे करतांना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने केलेल्या सूचनाचा विचार करावा, असेही श्री. भुजबळ म्हणाले.

## राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करावे - शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

**मुंबई :** विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता या बाबी महत्त्वाच्या असल्याने राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करून शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या अनुषंगाने राज्यातील शाळा इमारत सुरक्षितेसाठी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी तातडीने बैठक घेतली. मंत्रालयात झालेल्या या बैठकीस प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव समीर सावंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, समग्रचे प्रकल्प संचालक संजय यादव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि राज्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिक क्षेत्रातील शाळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटही करावे. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करावा. जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींची तपासणी करून त्यांची बांधकामे नव्याने करण्यासाठी सर्व्हे करून सर्व समावेशक आराखडा तयार करावा. तसेच धोकादायक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम ठरवून जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.